**दिनांक ०१.०१.२०२६ रोजी शेगांव, जि. बुलढाणा येथे अवैध सावकारी प्रकरणांबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शेगांव यांचे कार्यालयात बैठक**






**दिनांक ०१.०१.२०२६ रोजी शेगांव, जि. बुलढाणा येथे शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रास भेट व बैठक**





**दिनांक ०१.०१.२०२६ रोजी कठोरा, ता. शेगांव, जि. बुलढाणा येथे चारा लागवडी स्थळास भेट व पाहणी तसेच रोजगार सेवक यांचा सत्कार कार्यक्रमास उपस्थित**









देशोन्नती

# वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश पाटील यांची कठोरा येथे भेट

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेगाव :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश पाटील (राज्यमंत्री दर्जा) यांनी १ जानेवारी रोजी तालुक्यातील कठोरा येथे ग्रामपंचायतच्या ताब्यात असलेल्या पडीक जमिनीवरील कुरण लावगड परिक्षेत्राला भेट दिली.

यापुर्वी १४ जुलै २०२५ रोजी त्यांनी भेट देऊन ग्राम पंचायत ताब्यातील पडीक जमीनीवर कुरण लागवड करणे बाबत सुचीत केले होते. गट विकास अधिकारी पंचायत समिती शेगांव यांचे मार्गदशनानुसार ग्रामपंचायतीने ठराव घेऊन कुरण (चारा) लागवडी बाबत निर्धार केला व त्या नुसार पडीक ई क्लास जमिन तयार करुन ग्रामपंचायतने कुरण (चारा) नियोजन केले. त्यासाठी त्यांनी रेड नेपीअर गवताच्या थोंबा व कांडयाचा वापर करुन लागवड केली.

सदर कुरण (चारा) लागवड पाहणीकरीता अध्यक्ष कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली. ग्रामस्थांना दुग्ध व्यवसायात हिरव्या चाऱ्याचे



महत्व विषद केले. शेती सोबत पूरक जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाकडे शेतकऱ्यांनी वळावे व त्याकरीता लागणाऱ्या चाऱ्या करीता प्रत्येक शेतकऱ्याने किमान १० गुंठे क्षेत्रावर रेड नेपीअर या चारा पिकाची लागवड करावी. त्यासाठी लागणारे बेने हे ग्रामपंचायत ने लागवड केलेल्या प्रक्षेत्रा वरुन निशुल्क वाटप करण्या बाबत सुचित केले. शेतीस दुग्धव्यवसायाची जोड दिल्यास शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही असे मत त्यांनी या प्रसंगी मांडले व केलेल्या कामकाजा बाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. या प्रसंगी मंगेश गवई ग्रामरोजगार सहाय्यक यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांचा ॲड. निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांचेहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पंकज खंडारे ग्रामपंचायत अधिकारी कठोरा यांनी कुरण लागवडीकरीता विशेष परीश्रम घेतले.

सदर भेटी समयी श्रीमती सुषमा खवले सरपंच कठोरा, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ कठोरा, तसेच प्रज्ञा काकड तहसीलदार शेगांव, आर. टी. सुरुशे सहा. ग. वि. अ. पं. स. शेगांव, चोपडे तालुका कृषि अधिकारी, रविकिरणजी नावकार कृषि अधिकारी पं. स. शेगांव, श्रीरंग घाटोळ तांत्रीक सहाय्यक, मंडळ अधिकारी, तलाठी इत्यादी प्रशासकिय यंत्रणेचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. (ता. प्र.)

दिनांक ०१.०१.२०२६ रोजी विश्रामगृह शेगांव, जि. बुलढाणा येथे तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी, पशुवंवर्धन अधिकारी, सहा. निबंधक यांचे समवेत बैठक व चर्चा



दिनांक ०३.०१.२०२६ रोजी पाथरड (गोळे), ता. नेर परसोपंत, जि. यवतमाळ येथे शेतक-यांना चारा वाटप कार्यक्रमास उपस्थित




कुरण (चारा) कापणी शुभारंभ



# पाथ्रड गोळे येथे चारा कुरण कापणी शुभारंभ कार्यक्रम संपन्न



**दै. निर्मल विदर्भ**

शेतीला सहाय्यक जोडधंदा म्हणून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय सुरू करावा ह्या उद्देशपूर्तीकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र द्वारा चारा कुरण विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम राबविणारे तालुक्यातील एकमेव गाव पाथ्रड गोळे आहे. शासकीय जमिनीवर पावसाळ्यात लागवड केलेल्या चाऱ्याची पहिली कापणी ॲड. निलेश हेलोंडे पाटील अध्यक्ष वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून पुरुषोत्तम भुसारी तहसीलदार नेर, कु. नवले मॅडम तालुका कृषी अधिकारी, जयश्री भुजाडे तालुका पंचायत कृषी अधिकारी, संकेत खोडवे तालुका पशुसंवर्धन अधिकारी रवींद्र कानबले कृषी सहाय्यक, भरत पिसे ग्राम महसूल अधिकारीसह इतर शासकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय वृद्धीसाठी मोठ्या प्रमाणात चारा प्राप्त व्हावा, म्हणून हे अभियान आहे. तहसीलदार भुसारी साहेब म्हणाले की पाथ्रड गावांमध्ये शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबविल्या जातात. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. निलेश हेलोंडे पाटील, अध्यक्ष वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य ह्यांनी भुषविले. तर प्रमुख पाहुणे पुरुषोत्तम भुसारी, तहसीलदार, सौ. निलिमा रोशन चोपडे होते. शिवाय रजनी नरेंद्र खडसे उपसरपंच, मंदा महादेव गणवीर, नितीन चहांदे, आकाश तोंडरे सर्व ग्रामपंचायत सदस्य, प्रफुल नेरकर पोलीस पाटील, उमेश गोळे, इंद्रजीत चव्हाणसह मोठ्या प्रमाणावर पुरुष व महिला वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रोशन चोपडे, प्रास्ताविक रवि मानव सुराज्य व आभार प्रदर्शन सौरव सार्वे ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी दुग्ध व्यवसायी आशा बाबाराव गावंडे, कांता केशवराव तुपटकार व प्रफुल गणेश गायनर ह्यांना ॲड. निलेश निलेश हेलोंडे पाटील ह्यांच्या हस्ते कापणी केलेल्या चाऱ्याचे वितरण करण्यात आले.

देशोन्नती

# पाथ्रड गोळे येथे चारा कुरण कापणीचा शुभारंभ

देशोन्नती वृत्तसंकलन

## शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी 'मिशन स्वावलंबन'चा पुढाकार

**यवतमाळ,:** ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी व्हाव्यात यासाठी त्यांचे उत्पन्न वाढवणे आवश्यक आहे. केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता दुग्ध व्यवसायासारखे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देऊ शकतात. नेर तालुक्यातील प्रत्येक गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या नेपियर चाऱ्याचे ५-५ बुंधे (रोपटे) दिले जाणार आहेत, जेणेकरून तालुक्यात चारा टंचाई दूर होऊन पशुधन आणि दुग्ध व्यवसाय वृद्धीस लागेल.'असे विचार वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील योनी व्यक्त केले. पाथ्रड गोळे येथे चारा कुरण कापणीचे उद्घाटन प्रसंगी ते बोलते होते.



नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी पाथ्रड गोळे हे एक आदर्श गाव असून येथे शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. असे मत व्यक्त केले.

या प्रसंगी तालुका कृषी अधिकारी कु. नवले, तालुका पंचायत कृषी अधिकारी जयश्री भुजाडे, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संकेत खोडवे, सरपंच सौ. नीलिमा रोशन चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपसरपंच रजनी खडसे, ग्रामपंचायत सदस्य मंदा गणविर, नितीन चहांदे, आकाश तोंडरे, पोलीस पाटील प्रफुल्ल नेरकर, कृषी सहायक रवींद्र कानबाले, मंडळ अधिकारी थोटगे, उमेश गोळे व इंद्रजित चव्हाण यांच्यासह गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित दुग्ध व्यावसायिक आशा गावंडे, कांता तुपटकर आणि प्रफुल्ल गायनर यांना चाऱ्याचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. प्रास्ताविक रवी मानव सुराज्य यांनी केले, संचालन रोशन चोपडे यांनी तर आभार सौरव सारवे यांनी मानले. (प्रति.)

Yavatmal Edition

Jan 15, 2026 Page No. 6

Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# पाथ्रड गावात चारा कुरण कापणीचा उपक्रम

## शेतकरी स्वावलंबन मिशन अध्यक्षांच्या हस्ते शुभारंभ



**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**नेर** : शेतीला साहाय्यक जोडधंदा म्हणून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय सुरू करावा, या उद्देशपूर्तीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्रद्वारा चारा कुरण विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम राबविणारे तालुक्यातील एकमेव गाव पाथ्रड गोळे आहे. शासकीय जमिनीवर पावसाळ्यात लागवड केलेल्या चाऱ्याची पहिली कापणी वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्य हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. नीलेश हेलोंडे पाटील, प्रमुख अतिथी तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी, सरपंच निलिमा चोपडे, तालुका कृषी अधिकारी प्रतीक्षा नवले, कृषी अधिकारी जयश्री भुजाडे, तालुका पशुसंवर्धन अधिकारी संकेत खोडवे, कृषी पर्यवेक्षक रवींद्र कानबाले, ग्राम महसूल अधिकारी भरत पिसे आदींची उपस्थिती होती. ॲड. नीलेश हेलोंडे पाटील म्हणाले की शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय वृद्धीसाठी मोठ्या प्रमाणात चारा प्राप्त व्हावा, म्हणून हे अभियान आहे.

तहसीलदार भुसारी यांनी पाथ्रड गावांमध्ये शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबविल्या जात असल्याची माहिती दिली. यावेळी उपसरपंच रजनी खडसे, ग्रामपंचायत सदस्य मंदा गणवीर, नितीन चहांदे, आकाश तोंडरे, प्रफुल्ल नेरकर पोलीस पाटील, उमेश गोळे, इंद्रजीत चव्हाणसह मोठ्या प्रमाणावर पुरुष व महिला वर्ग उपस्थित होत्या. प्रास्ताविक रवी मानव सुराज्य यांनी केले. संचालन रोशन चोपडे यांनी केले, तर आभार सौरव सार्वे यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी दुग्ध व्यवसायी आशा गावंडे, कांता तुपटकर व प्रफुल्ल गायनर यांना ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते कापणी केलेल्या चाऱ्याचे वितरण करण्यात आले.

दिनांक ०५.०१.२०२६ रोजी कृषी उपसंचालक, उपायुक्त (पशुसंवर्धन), संचालक (आत्मा), जिल्हा रेशीम व्यवसाय अधिकारी यांचे समवेत दुग्धउत्पादन व अंडीउत्पादन संदर्भात दालनामध्ये बैठक व चर्चा





दिनांक १२.०१.२०२५ रोजी मासोद, ता. जि. अमरावती येथे गायरान जमीनीवर काटे विरहीत निवडूंग लागवड कार्यक्रमास उपस्थित





दिनांक १९.०१.२०२५ रोजी विश्रामगृह मानोरा, जि. वाशिम येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, आरसेटी व इतर अधिकारी यांचे समवेत शेतकरी आत्महत्या, चारा लागवड तसेच शेतक-यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासंबंधी बैठक व चर्चा





# वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनच्या अध्यक्षांनी घेतला आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मानोरा :** कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी १९ जानेवारी रोजी मानोरा येथील शासकीय विश्रामगृह येथे शेतकऱ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी मानोरा तहसीलदार उमेश बन्सोड, गटविकास अधिकारी विलास जाधव, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ओ. रोम, बालविकास प्रकल्प अधिकारी कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. ॲड. नीलेश हेलोंडे म्हणाले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पीक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल. चिया लागवड वाढवून त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. मानोरा तालुक्यात चिया लागवडीचे अधिकाधिक उद्दिष्ट ठेवण्यावर त्यांनी भर दिला.



मानोरा येथे अधिकाऱ्यांकडून आढावा घेताना ॲड. नीलेश हेलोंडे.

## चारा लागवड प्रकल्प

७ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मानोरा तालुक्यातील कारखेडा येथे ई-क्लास जमिनीवर चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी झटका मशिन व तार कुंपणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**यावेळी कारखेडा गावचे सरपंच , नागरिक उपस्थित होते.**

## चारा लागवडीबाबत विशेष प्रशिक्षण

दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्यासाठी चारा लागवड अत्यावश्यक आहे. शेती, चारा आणि दुग्ध व्यवसाय यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळू शकते.

**यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) चारा लागवडीचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले.**

सकाळ

# शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'संगमनेर पॅटर्न'

## ॲड. नीलेश हेलोंडे : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची आढावा बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

**मानोरा, ता. २० : शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पिक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी केले.**



मानोरा : [illegible] ॲड. नीलेश हेलोंडे.

[illegible]

### प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे

■ [illegible]

### चारा लागवडीचे प्रस्ताव करा सादर

■ [illegible]

देशोन्नती

# शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी संगमनेर पॅटर्न राबवावा

## आढाव बैठकीत ॲड. निलेश हेलोंडे यांचे प्रतिपादन



**देशोन्नती वृत्तसंकलन**

**वाशिम :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पिक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

मानोरा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीत शेतकऱ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मानोरा तहसीलदार उमेश बन्सोड, गटविकास अधिकारी विलास जाधव, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ओ. रोम, बालविकास प्रकल्प अधिकारी कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. ॲड. पाटील म्हणाले की, चिया सारखी कमी खर्चाची व अधिक उत्पन्न देणारी पिके भविष्यातील शेतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यामुळे जिल्ह्यात चिया लागवड वाढवून त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना मूल्यवर्धनाचा लाभ मिळून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील. मानोरा तालुक्यात किमान एक हजार हेक्टर क्षेत्रावर चिया लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यावर त्यांनी भर दिला. दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्यासाठी चारा लागवड अत्यावश्यक आहे. शेती, चारा आणि दुग्ध व्यवसाय यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळू शकते. यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. शासनाच्या विविध योजना प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात की नाही, यावर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी दुग्ध व्यवसाय सुरू झाल्यास शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊन गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शेतकऱ्यांनी शेती सोबत दुध व्यवसायाला चाला द्यावी

शेतकऱ्यांनी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय व शेतीपूरक उद्योगांना चालना द्यावी, असे आवाहन करताना त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) चारा लागवडीचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. दि. ७ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मानोरा तालुक्यातील कारखेडा येथे ई-क्लास जमिनीवर चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी झटका मशिन व तार कुंपणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बैठकीस कारखेडा गावचे सरपंच , नागरिक तसेच पत्रकार उपस्थित होते.

दैनिक सुवर्ण महाराष्ट्र

January 20, 2026
Page no 6
suvarnamaharashtra.in

# शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'संगमनेर पॅटर्न' संपूर्ण जिल्ह्यात राबवावा-ॲड. निलेश हेलौडे

**वाशिम, दि. १९ जानेवारी (जिमाका):** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पिक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

मानोरा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीत शेतकऱ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मानोरा तहसीलदार उमेश बन्सोड, गटविकास अधिकारी विलास जाधव, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ओ. रोम, बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

ॲड. पाटील म्हणाले की, चिया सारखी कमी खर्चाची व अधिक उत्पन्न देणारी पिके भविष्यातील शेतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यामुळे जिल्ह्यात चिया लागवड वाढवून त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना मूल्यवर्धनाचा लाभ मिळून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील. मानोरा तालुक्यात किमान एक हजार हेक्टर क्षेत्रावर चिया लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यावर त्यांनी भर दिला.

दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्यासाठी चारा लागवड अत्यावश्यक आहे. शेती, चारा आणि दुग्ध व्यवसाय यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळू शकते. यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शासनाच्या विविध योजना प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात की नाही, यावर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी दुग्ध व्यवसाय सुरू झाल्यास शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊन गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



शेतकऱ्यांनी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय व शेतीपूरक उद्योगांना चालना द्यावी, असे आवाहन करताना त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) चारा लागवडीचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. दि. ७ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मानोरा तालुक्यातील कारखेडा येथे ई-क्लास जमिनीवर चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी झटका मशिन व तार कुंपणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या बैठकीस कारखेडा गावचे सरपंच , नागरिक तसेच पत्रकार उपस्थित होते.



**कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची आढावा बैठक**

दिनांक १९.०१.२०२६ रोजी इंझोरा, ता. मानोरा, जि. वाशिम येथे चिया शेतीस भेट व पाहणी





देशोन्नती

# शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी चिया पिकाचे क्षेत्र वाढवावे - अ‍ॅड. हेलोंडे

देशोन्नती वृत्तसंकलन



**मानोरा** : महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) अ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी नुकताच आकांक्षित मानोरा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी शेतकरी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या समस्या जाणून घेतल्या. यासोबतच तालुका स्तरीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन विविध उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

स्थानिक तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत बोलताना अ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी मानोरा तालुक्यात 'चिया' पिकाखालील क्षेत्र एक हजार हेक्टरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्याची गरज व्यक्त केली. चिया पिकामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत शासकीय ई-क्लास जमिनीवर चारा लागवड करण्याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा बैठकीनंतर अ‍ॅड. हेलोंडे पाटील यांनी इंजोरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा तातडीने लाभ मिळवून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या प्रसंगी प्रभारी तहसीलदार उमेश बनसोड, गट विकास अधिकारी सुधाकर जाधव, तालुका महिला व बालकल्याण अधिकारी अनुप कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये शिवसेना तालुका प्रमुख डॉ. दीपक करसडे, शहर प्रमुख भगवान देशमुख, उपजिल्हा प्रमुख श्रीधर ठाकरे, राजू ठाकरे, नरेंद्र खुपसे, विनोद राठोड, एकनाथ कोल्हे आदींचा प्रामुख्याने समावेश होता. (प्रती)

**दिनांक १९.०१.२०२६ रोजी इंझोरा, ता. मानोरा, जि. वाशिम येथे मृतक डिगांबर गजानन इंगळे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**





देशोन्नती

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ द्या

## ॲड. निलेश पाटील हेलोडे यांचे प्रशासनाला निर्देश



**मानोरा :** तालुक्यातील इझोरी येथील दोन आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश पाटील हेलोडे यांनी सोमवारी १९ सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तातडीने मिळवून देण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. मानोरा तालुक्यातील इझोरी येथील डिगांबर गजानन इंगळे व शाम तुळशीराम शिंदे या दोन शेतकऱ्यांनी काही वर्षांपूर्वी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली होती. या कुटुंबांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी ॲड हेलोडे यांनी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेट दिली.

यावेळी ॲड हेलोडे यांनी स्व. शाम शिंदे यांच्या पत्नी संगीता शिंदे, त्यांच्या दोन मुली व मुलगा, तसेच स्व. डिगांबर इंगळे यांच्या पत्नी शितल इंगळे व त्यांच्या मुलांशी सविस्तर चर्चा केली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची साधने आणि मुलांच्या शिक्षणाबाबत त्यांनी आस्थेवाईकपणे विचारपूस केली. शेतकरी आत्महत्या ग्रस्थ कुटुंबांना जगण्यासाठी भक्कम आधार मिळावा यासाठी ॲड. हेलोडे यांनी खालील बाबी तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले. मुलांच्या शिक्षणासाठी शासनाकडून मिळणारा शैक्षणिक लाभ त्वरित मंजूर करणे. शेतात विहीर आणि पाईपलाईनची सोय उपलब्ध करून देणे. कुटुंबातील महिलांना अर्थार्जनासाठी पशुपालन, शिलाई मशीन मिळवून देणे, दोन्ही कुटुंबांना हक्काचे 'घरकुल' उपलब्ध करून देणेया दौऱ्याप्रसंगी प्रभारी तहसीलदार उमेश बनसोड, गटविकास अधिकारी सुधाकर जाधव, तालुका महिला व बालकल्याण अधिकारी अनुप कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड, ग्रामविकास अधिकारी सुरेश चव्हाण उपस्थित होते. तसेच पत्रकार राजू ठाकरे, सरपंच मनीषाताई दिघडे, माजी सरपंच हिम्मत राऊत यांच्यासह विविध विभागांचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रति)

**दिनांक १९.०१.२०२६ रोजी इंझोरा, ता. मानोरा, जि. वाशिम येथे मृतक श्याम तुळशीराम शिंदे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**





तरुण भारत
Akola Main | 2026-01-20 | Page- 14
epaper.tarunbharat.net

आहे.

# ॲड. नीलेश हेलोंडे यांचा शेतकऱ्यांशी थेट संवाद

**मानोरा** : शेतकरी हा शेतीचा कणा असून त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष ऐकून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे, या भावनेतून वसंतराव नाईक शेती स्वालंबन योजनेचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी मानोरा तालुक्याला भेट देत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी झालेल्या आढावा बैठकीत शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, शेती उत्पादन खर्च, अपुऱ्या चाऱ्याची समस्या तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या अडचणी यावर सखोल चर्चा करण्यात आली. मानोरा तालुक्यात चिया पिकाचे क्षेत्र एक हजार हेक्टरपर्यंत वाढवून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्नाचा नवा पर्याय उपलब्ध करून देण्याचा निर्णय यावेळी चर्चेत आला. तसेच ग्रामपंचायतीमार्फत शासकीय ई-क्लास जमिनीवर जनावरांसाठी चारा लागवड केल्यास पशुपालक शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यानंतर अध्यक्ष नीलेश हेलोंडे यांनी इंजोरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी

दिनांक २१.०१.२०२६ रोजी वरोरा, जि. चंद्रपूर येथे चारा केंद्रास भेट व पाहणी










Latitude: 20.370752
Longitude: 79.019798
Elevation: 222.2±11.1 m
Accuracy: 18.54 m
Time: 21-01-2026 15:32
Powered by NoteCam


Latitude: 20.370235
Longitude: 79.018881
Elevation: 240.04±12.3 m
Accuracy: 14.6 m
Time: 21-01-2026 16:03
Powered by NoteCam


Latitude: 20.370266
Longitude: 79.019836
Elevation: 230.13±4.35 m
Accuracy: 10.67 m
Time: 21-01-2026 15:30
Powered by NoteCam

दिनांक २१.०१.२०२६ रोजी वणी, जि. यवतमाळ येथे गोरक्षण संस्थेस भेट तसेच चारा लागवड पाहणी








GPS Map Camera
Wani, Maharashtra, India
3w4w+4xx Gaurakshan (cow Seucuracy), Wani,
Maharashtra 445304, India
Lat 20.055051° Long 78.94718°
Wednesday, 21/01/2026 05:11 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Wani, Maharashtra, India
3w4w+4xx Gaurakshan (cow Seucuracy), Wani,
Maharashtra 445304, India
Lat 20.055045° Long 78.94724°
Wednesday, 21/01/2026 05:14 PM GMT +05:30
Google

**दिनांक २२.०१.२०२६ रोजी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल जि. नागपूर येथे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला द्वारा आयोजीत फळपिक पाहणी व चर्चासत्र कार्यक्रमास उपस्थित**





दिनांक २५.०१.२०२६ रोजी लाखोटिया भुतडा हायस्कुल, कोंढाळी जि. नागपूर येथे आयोजीत सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित






लाखोटिया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,कोंढाळी




# लय, कला और अभिव्यक्ति का संगम बना शालेय स्नेहसम्मेलन

## > लाखोटिया भूतड़ा सीबीएसई स्कूल, कोंढाली में सांस्कृतिक महोत्सव का भव्य आयोजन

**कोंढाली.**

विद्यालयीन स्नेहसंमेलन केवल मनोरंजन तक सीमित न रहकर विद्यार्थियों के आत्मविश्वास, संघभावना और नेतृत्व क्षमता के विकस का सशक्त माध्यम होता है। स्नेहसंमेलन के जरिए विद्यार्थियों को लय, कला, संगीत, मौलिकता और अभिव्यक्ति के सर्वांगीण विकास का सुनहरा अवसर प्राप्त होता है। यह प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ने राज्यमंत्री दर्जा प्राप्त तथा वसंतराव नाईक शेतकरी एड के संचालक निलेश हेलोंडे ने किया।।

वे 25 जनवरी को लाखोटिया भूतड़ा सीबीएसई हाईस्कूल, कोंढाळी में आयोजित सांस्कृतिक महोत्सव एवं शालेय स्नेहसंमेलन में प्रमुख मार्गदर्शक के रूप में बोल रहे थे। कार्यक्रम में



बड़ी संख्या में विद्यार्थी, अभिभावक, शिक्षण संस्था के पदाधिकारी, शिक्षक एवं शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित थे।

अपने मार्गदर्शन मे निलेश हेलोंडे ने कहा कि आज के प्रतिस्पर्धात्मक युग में शैक्षणिक प्रगति के साथ-साथ संवाद कौशल, आत्मविश्वास, टीमवर्क और नेतृत्व गुणों का विकास अत्यंत आवश्यक है। शालेय स्नेहसंमेलन एवं सांस्कृतिक गतिविधियां विद्यार्थियों के व्यक्तित्व निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाती हैं। ऐसे कार्यक्रम विद्यार्थियों को मंच प्रदान कर उनकी छिपी प्रतिभा को उजागर करते हैं और स्वयं को पहचानने का आत्मविश्वास देते है। इस अवसर पर डॉ. आशिष तायवाडे ने छत्रपति शिवाजी महाराज के गौरवशाली इतिहास पर प्रकाश डालते हुए विद्यार्थियों को प्रेरणादायी शैक्षणिक मार्गदर्शन किया तथा अभिभावकों से बच्चों के साथ निरंतर संवाद बनाए रखने का संदेश दिया।

कार्यक्रम की अध्यक्षता संस्था संचालक आनंद राठी ने की। प्रमुख अतिथियों में कोंढाळी नगर पंचायत की उपाध्यक्ष हेमलता पार्लेवाल, डॉ. एन. टी. कटरे, माजी प्राचार्य सुधीर बुटे, प्राचार्य कैलास थुल, पुरुषोत्तम धोटे, नगर सेवक स्वप्निल व्यास, प्रज्वल धोटे, सनोबर शेख, आम्रपाली मारनवरे, एड. ललीतमोहन कालबांडे, सुरेंद्र भाजीखाये, दुर्गा प्रसाद पांडे, नितीन ठवळे, प्रभुदयाल शर्मा, सुनील सोलव, हर्षण राठी, गोरेश चौधरी, गजेंद्र डोंगरे, पवन तिवारी, अभिजीत चव्हाण सहित अनेक गणमान्य उपस्थित थे। विद्यालय के प्राचार्य आशुतोष केदार पवार ने सीबीएसई हाईस्कूल के शैक्षणिक सत्र 2025-26 का वार्षिक प्रतिवेदन प्रस्तुत किया। मान्यवरों ने विद्यार्थियों को अनुशासन, परिश्रम, मूल्याधारित शिक्षा एवं संस्कारों के महत्व पर मार्गदर्शन किया। कार्यक्रम में नर्सरी से लेकर हाईस्कूल तक के विद्यार्थियों ने देश के विभिन्न राज्यों के लोकनृत्य प्रस्तुत किए। साथ ही पर्यावरण संरक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान तथा मोबाइल के दुरुपयोग से बचाव जैसे सामाजिक विषयों पर आधारित सांस्कृतिक प्रस्तुतियों ने दर्शकों का मन मोह लिया। नृत्य, गीत, नाटक एवं कलात्मक प्रस्तुतियों की अभिभावकों द्वारा भी भरपूर सराहना की गई। कार्यक्रम के सफल आयोजन के लिए उपस्थित मान्यवरों ने शाला प्रबंधन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद एवं विद्यार्थियों की प्रशंसा की। लाखोटिया भूतड़ा सीबीएसई हाईस्कूल का यह सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थियों के सर्वांगीण विकास के लिए प्रेरणादायी सिद्ध हुआ। कार्यक्रम का प्रभावी संचालन श्वेता पांडे एवं अरुणा रमधम ने किया।

दिनांक २६.०१.२०२६ रोजी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड ग्राऊंड येथे प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रमास उपस्थित तसेच मा. ना. श्री. दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री यांचे समवेत भेट व मिशनचे कामकाजासंबंधी चर्चा

